राज्यातील शासकीय वनात होत असलेल्या अवैध वृक्षतोडीमुळे होणाऱ्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी [सुधारीत] तिमाही मुल्यन अहवाल

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग
क्रमांक–टिआरएस–१०८३/प्रक्र१११/९४/फ–६
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक २४ जुन १९९४.

UL 1994

परिपत्रक.

राज्यातील शासकीय वनात होत असलेल्या अवैध वृक्षतोडीचा आढावा घेण्यासाठी शासन परिपत्रक क्र. टिआरएस–१०८३/९३६४६/प्रक्र१११/फ–६, दिनांक–२६–४–१९८३ नुसार विहित तक्त्यात अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तथापि सदरहु तिमाही मुल्यन अहवाल पाहता असे दिसून येते की, अवैध वृक्षतोडीमुळे काही वनवृतांमध्ये नुकसानीपेक्षा जप्त मालाची किंमत १०० % पेक्षाअधिक प्रमाणात आहे.

२. वर उल्लेखिलेल्या २६–४–८३ परिपत्रका सोबतच्या तक्त्यामध्ये अंशतः या बदल करण्यात आला आहे. नव्याने तयार केलेला तक्ता सोबत जोडला आहे. (सुधारीत तक्त्यानुसारच दि. २६–४–८३ च्या परिपत्रकातील विहित वेळेवर यापुढील अवैध वृक्षतोडीचा माहिती शासनाला सादर करण्यात यावी यावरुन अवैध वृक्षतोडीने झालेल्या नुकसानीची किंमत व तोड केलेल्या झाडाच्या बुडाजवळील जप्त केलेल्या मालाची किंमत यांचा फरक लक्षात येईल. याप्रमाणे अवैध वृक्षतोडीचा तिमाही मुल्यन अहवाल मुख्य वन संरक्षक(संधारण) यांनी शासनाला सादर करावा. जर एखाद्या वनवृतातील वन–विभागामध्ये जप्त मालाची किंमत अवैध वृक्षतोडीने झालेल्या नुकसानीची किंमतीपेक्षा जास्त असेल तर तिमाही मुल्यन अहवालामध्ये याबाबतचा खुलासा देण्यात यावा.

३. विधानमंडळाकडून प्राप्त झालेल्या ~~तारा~~ तारांकित / अतारांकित, लक्षवेधी सूचना इ. मध्ये अवैध वृक्षतोडीसंबंधात माहिती पाठवितानाही अन्य ठिकाणी जप्त ~~केले~~ केलेल्या मालाशिवाय अवैध तोड झालेल्या झाडाच्या बुडाजवळील जप्त केलेल्या मालाची किंमत, नग व घ. मि. यांचा माहितीचा वेगळ्याने समावेश करण्यात यावा.

ज. ना. सक्सेना
[ज. ना. सक्सेना]
सह सचिव,
महसूल व वन विभाग.

Govt. Circulars – Illicit Cutting
Quarterly report

कृ. मा. पा.

प्रत:-

प्रधानमुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
मुख्य वनसंरक्षक [संधारणा] महाराष्ट्र राज्य, नागपूर.
सर्व वनसंरक्षक, [५०१६] वनवृत्त,
सर्व उपवनसंरक्षक, वन विभाग,
सर्व उपविभागीय वनाधिकारी, [ ५], वनविभाग,
सर्व कार्यासने वनविभाग, महसूल व वन विभाग,
कार्यासन अधिकारी [फ६] निवडनस्ती.